# पो.अ.मैथिली झा यांचे हस्ते स्वॉफ्ट स्किल डेव्हलपमेन्ट कार्यक्रमाचे उद्‌घाटन

परभणी -

येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात वणिज्य व व्यवस्थापन विभागाच्या वतीने मनुष्यबळ विकासांतर्गत दिनांक ३ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट या कालावधीत दहा दिवशीय स्वॉफ्ट स्किल डेव्हलपमेन्ट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात वेळेचे व्यवस्थापन, संदेशवहन कौशल्य, प्रश्नांची सोडवणूक तंत्र, धोक्याचे व्वस्थापन, ताण तणाव व्यवस्थापन इत्यादी विविध स्वॉफ्ट स्किल्स तंत्राद्वारे शिकवून सहभागी विद्यार्थ्यांना नोकरीसाठी प्रशिक्षित केले जाणार आहे.

सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन दि. ३.८.२०११ रोजी मा. पोलिस अधिक्षक श्रीमती मैथिली झा यांचे हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.खासदार ॲड. गणेशरावजी दुधगावकर उपस्थित राहणार आहेत. तर डॉ.सौ.संध्याताई दुधगावकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोरे यांनी केले आहे.

# "बँक राष्ट्रीयकरणातून अर्थव्यवस्थेस गती मिळाली"

**- प्रा.डॉ. अरुण तवार**

परभणी -

१९ जुलै १९६९ रोजी श्रीमती इंदिरा गांधी यांनी क्रांतीकारी निर्णय घेऊन खाजगी क्षेत्रातील १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयकरण केले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासास गती मिळाली असे मत प्रा.डॉ. अरुण तवार यांनी व्यक्त केले. ते येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन विभागात अंतर्गत बँक राष्ट्रीयकरणानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश मोरे होते. डॉ. तवार पुढे बोलताना बँक राष्ट्रीयकरणातून बँक व्यवस्थापन झ ालेले अमुलाग्र बदल व त्याच्या आर्थिक व सामाजिक विकासावर झालेला पुरक परिणामाचा आढावा घेऊन बँकेकडे राष्ट्रीकरण हे योग्य पाऊल होते हे सिध्द झाल्याचे नमूद केले. कार्यक्रमास प्रा. सुधाकर चित्ताडे यांनी यथोचित मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. प्रकाश मोरे यांनी बँक हि अर्थव्यवस्थेचा कणा असून राष्ट्रीयकृत बँकेचा सकारात्मक दृष्टीकोन देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट करणारा ठरु शकतो. असे नमूद केले.

याच कार्यक्रमात सोनल अग्रवाल, मोनिका पोरवाल, श्रीलेखा सोमानी, निकिता वाघमारे, वैशाली नखाते, टोपे एस.एस., योगेश गाडेकर यांनी तयार केलेल्या बँक भितिपत्रकाने प्रकाशन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या वतीने योगेश गाडेकर, सूर्यवंशी पी.बी., मोनिका पोरवाल, सोनल अग्रवाल, श्रीलेखा सोमानी इत्यादींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास डॉ. एम.एन. सोंडगे, डॉ. प्रभाकर हरकळ, डॉ. अशोक श्रीरामे यांचेसह वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सय्यद अरीफ योने केले तर रवि मानकर यांनी आभार मानले.

# "जागतिकीकरणात वाणिज्य शाखेस उज्ज्वल भवितव्य"

**- डॉ. प्रकाश मोरे**

परभणी -

सध्या खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामुळे प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्रात कमालीचे बदल होत आहेत. त्यामुळे उद्योग व सेवा क्षेत्रात वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना उज्वल भविष्य आहे, असे मत प्राचार्य डॉ. प्रकाश मोरे यांनी व्यक्त केले. ते येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन विभागांतर्गत आयोजित पाच दिवशीय ब्रीज कोर्स उद्‌घाटन प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. त्यांनी पुढे बोलताना बदलत्या काळातील उच्च शिक्षण व विविध संधी यावर प्रकाश टाकला. प्रमुख अतिथि व उदघाटक म्हणून बोलताना प्रा. वामनराव सूर्यवंशी यांनी वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील अध्यापनाचा दांडगा अनुभव कथन करुन, विज्ञान व कला शाखेप्रमाणे वाणिज्य शाखेची पदवी सुध्दा अधिक विषय उपलब्ध असावेत ज्यामुळे वाणिज्य शाखेची उपयोगिता अधिक वाढेल यावर भर दिला व विद्यापीठ व शासनाने या संदर्भात सकारात्मक पाऊल उचलण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम.एन. सोंडगे यांनी केले. डॉ. प्रभाकर हरकळ यांनी सूत्रसंचलन केले तर कु. मुंढे सिमा यांनी आभार मानले.